SPB
SHRI PISARNATH BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित
कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर
मा.खा.रावसाहेब पाटील दानवे (अध्यक्ष) (माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)
मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे (सचिव) (छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)
मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे (भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)
BA, Bcom, Bsc First Year विद्यार्थ्यांसाठी १५ जून २०२६ पासून प्रवेश सुरु
श्री.विजय देसाई : 9403251705

वर्ष : ०५ | अंक : ३२२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०३ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## चंद्रपूर हादरलं ! नवजात बालक विक्री प्रकरणी भाजपाच्या दोन महिला पदाधिकाऱ्यांना अटक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** पैशांच्या हव्यासापोटी एका कसाई मातेने आपल्याच अल्पवयीन मुलीच्या नवजात बाळाचा सौदा केल्याची घटना ताजी असतानाच, आता या प्रकरणाला एक मोठे राजकीय वळण मिळाले आहे. या बालक विक्री प्रकरणात चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या गटातील दोन प्रमुख महिला कार्यकर्त्यांना रामनगर पोलिसांनी अटक केली आहे.

चंद्रपूर शहर या घटनेने पुरते हादरून गेले आहे. रामनगर पोलिसांनी अत्यंत कौशल्यपूर्ण तपास करत तब्बल महिनाभरानंतर या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. भाजपा आमदार किशोर जोरगेवार यांच्या गटातील कट्टर कार्यकर्त्या सायली येरणे आणि भाग्यश्री हांडे या दोन्ही महिला पदाधिकाऱ्यांना या प्रकरणात थेट सहभाग असल्याच्या संशयावरून अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने या दोन्ही महिलांची रवानगी आता न्यायालयीन कोठडीत (जेलमध्ये) केली आहे.

या प्रकरणात आधीच अनेक धक्कादायक खुलासे झाले होते. पीडित अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणारा तिचा प्रियकर अजय फुलझेले, पोटच्या गोळ्याचा सौदा करणारी ती निर्दयी माता, आणि बेकायदेशीरपणे बाळ खरेदी करणाऱ्या दोन महिला आधीच पोलिसांच्या ताब्यात आहेत. पण आता या संपूर्ण खरेदी-विक्रीच्या व्यवहारात या दोन राजकीय महिला पदाधिकाऱ्यांचे नाव समोर आल्याने चंद्रपूरच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

पैशांच्या मोहापायी नवजात जिवाचा बाजार मांडणाऱ्या या टोळीमध्ये आणखी कोणाकोणाचा समावेश आहे? आणि या मागे काही मोठे रॅकेट कार्यरत आहे का? याचा तपास आता रामनगर पोलिस करत आहेत.

# मुंबईतून नवा १५७ किमी लांब द्रुतगती महामार्ग

## ऑगस्टमध्ये प्रवासासाठी खुला होणार; कुठून-कुठे जोडणार?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पालघर जिल्ह्यात मुंबई-दिल्ली द्रुतगती मार्गाच्या कामाची पाहणी केली. त्यावेळी या मार्गावरील मुंबई ते वडोदरा द्रुतगती महामार्गाचं काम जवळपास पूर्ण झालं असल्याची त्यांनी माहिती दिली. त्यामुळे मुंबई ते वडोदरा प्रवासाचा वेळ अर्ध्यावर येणार आहे. अवघ्या चार तासांत अंतर पार करता येणार आहे. प्रवाशांसाठी एक सुरक्षित, वेगवान आणि कोंडीमुक्त मार्ग उपलब्ध होणार आहे. ऑगस्ट अखेरपर्यंत या मार्गाचं काम पूर्ण होईल आणि ३१ तारखेपर्यंत मार्ग प्रवासासाठी खुला होईल अशी माहिती त्यांनी दिली.

**१,४०० किमी लांब ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्ग...**

रविवारी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाइक आणि मत्स्य व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांच्यासह पालघरमधील अनेक प्रकल्पांची पाहणी केली. केंद्र सरकार तब्बल १ लाख कोटींचा खर्च करून १,४०० किमी लांब



ग्रीनफील्ड द्रुतगती महामार्ग बांधत आहे. भारतातील पाच राज्यांमधून हा मार्ग जाणार आहे. हरयाणा, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्राला जोडणार आहे. या मार्गाचं काम पूर्ण होताच दिल्ली ते मुंबई प्रवासाचं अंतर फार कमी होणार आहे वेगवान कनेक्टिव्हीटीचा पर्याय उपलब्ध होणार आहे. या दोन औद्योगिक शहरांदरम्यान प्रवास सोपा होणार आहे. हा महामार्ग थेट जेएनपीटी बंदराला जोडलेला असेल. त्यामुळे उत्तर भारतातून जेएनपीटीपर्यंत मालवाहतूक सोपी होणार आहे. त्यासह प्रवासाचा खर्चही कमी होणार आहे.

या मार्गावर मुंबई ते वडोदरा १५७ किलोमीटर लांग द्रुतगती महामार्ग असेल. या पट्ट्यासाठी तब्बल २४,००० कोटी रुपये खर्च आला आहे. या मार्गाचं काम सात टप्प्यांमध्ये केलं जात आहे. त्यापैकी पाच टप्प्यांचं काम पूर्ण झालं आहे. उर्वरित दोन टप्प्यांवरील कामं ऑगस्ट अखेरपर्यंत पूर्ण होतील अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली होती.

**ठाणे, भिवंडी, घोडबंदर मार्गांवरील कोंडी फुटणार**

सध्या ठाणे, भिवंडी, घोडबंदर मार्गांवरील होणाऱ्या वाहतूककोंडीतून नागरिकांची सुटका होणार आहे. यामुळे प्रवासात वेळ वाचेल व इंधनबचतही होईल. मालवाहतुकीसाठी एक वेगवान मार्ग निर्माण होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी बांधकामाच्या प्रगतीची पाहणी केली आणि अधिकाऱ्यांना दिलेल्या वेळेत काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. पण त्याचवेळी प्रकल्पाच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड न करता हे काम पूर्ण करण्याचा आदेश दिला आहे.

या संपूर्ण महामार्गाचं काम पूर्ण झाल्यावर उत्तर आमि पश्चिम भारतातून मुंबईतील बंदरांपर्यंत कनेक्टिव्हिटी सुधारणार आहे. यामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळेल आणि रोजगार निर्मिती होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. भारतातील पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा आहे असे त्यांनी सांगितले.

## अंमली पदार्थ तस्करीवर, लक्ष्मीनगर पोलिसांचा घाव; आरोपी गजाआड

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, येरवडा (पुणे) :** लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने अंमली पदार्थांविरोधात प्रभावी कारवाई करत येरवडा परिसरातून १ किलो १३० ग्रॅम गांजासह एका आरोपीला अटक केली. विशाल गणेश कसबे (वय ३१, रा. सर्व्हे नं. १२, भीमज्योत मित्र मंडळाजवळ, लक्ष्मीनगर, येरवडा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पो.शि.राहुल परदेशी व अतुल जाधव परिसरात गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, तारकेश्वर मंदिराशेजारी, ठाकरसी पाण्याच्या टाकीजवळ एक व्यक्ती गांजाची विक्री करण्यासाठी थांबला आहे. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ सापाळा लावून छापा टाकला आणि विशाल कसबे याला ताब्यात घेतले.

झडतीदरम्यान आरोपीकडून २२ हजार ६०० रुपयांचा १ किलो १३० ग्रॅम गांजा, ५० हजार रुपयांची ॲक्टिव्हा दुचाकी आणि ५ हजार रुपयांचा मोबाईल असा एकूण ७७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी पोलीस हवालदार अमोल अरुण गायकवाड यांच्या फिर्यादीवरून लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निखिल पवार, पो. शि.राहुल परदेशी, अतुल जाधव पो.शि. कांबळे या पथकाने केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नलवडे करीत आहेत.

## सैराट नंतर नागराज मंजुळेंचा 'खाशाबा' कुस्तीचा आखाडा गाजवणार


**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०२, मुंबई :** आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेते आणि सैराट तथा फॅन्ड्री सारख्या सुपर डूपर यशस्वी चित्रपट देणाऱ्या नागराज मंजुळे यांच्या बहुचर्चित खाशाबा चित्रपटाचा दमदार टीझर नुकताच मुंबईत रिलीज झाला.

भारतासाठी खेळताना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये पहिले वैयक्तिक कांस्यपदक पटकावत भारतीय क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करणाऱ्या खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या प्रेरणादायी आणि संघर्षमय जीवनप्रवासावर हा चित्रपट आधारित आहे.

धुरंधर', 'धुरंधर : द रिव्हेंज' आणि 'राजा शिवाजी' यांसारखे सलग यशस्वी चित्रपट देत, भारतीय चित्रपटसृष्टीत आपलं वेगळं स्थान निर्माण करणाऱ्या जिओ स्टुडिओजने आणखी एक महत्त्वाकांक्षी निर्मिती केली आहे. 'फॅन्ड्री' आणि 'सैराट'सारख्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवलेल्या चित्रपटांनंतर दिग्दर्शक नागराज मंजुळे 'खाशाबा' या बहुचर्चित चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा एका भव्य आणि प्रेरणादायी कथेसह प्रेक्षकांच्या भेटीस येत आहेत. चित्रपटगृहांमध्ये प्रथम प्रदर्शित झालेल्या 'खाशाबा'च्या टीझरला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. आता तो डिजिटल प्लॅटफॉर्मसवर रिलीज करण्यात आला आहे. पारंपरिक कुस्तीच्या आखाड्याचं भव्य चित्रण, दमदार दृश्यरचना, उत्कंठावर्धक वातावरण, संघर्षाची भावनिक तीव्रता आणि चित्रपटाचा सिनेमॅटिक आवाका या टीझरमधून प्रभावीपणे अनुभवायला मिळतो.

नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताच्या पार्श्वभूमीवर घडणारा हा चित्रपट महाराष्ट्रातील एका संघर्षशील कुस्तीपटूची प्रेरणादायी कहाणी सांगतो. 'खाशाबा' हा चित्रपट स्वतंत्र भारताला पहिलं वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे महाराष्ट्राचे सुपुत्र आणि दिग्गज कुस्तीपटू



खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या संघर्षमय जीवन प्रवासावर आधारित आहे. अत्यंत कठीण परिस्थितीवर मात करून प्रसंगी स्वतःचे घर देखील गहाण ठेवून त्यांनी १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक पटकावलं आणि भारतीय क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा इतिहास घडवला. भारतीय क्रीडाक्षेत्रातील हा अभिमानास्पद प्रवास मोठ्या पडद्यावर भव्य स्वरूपात साकारत हा चित्रपट प्रादेशिक सिनेमातील सर्वात मोठ्या क्रीडापटांपैकी एक ठरण्याची क्षमता बाळगून आहे.

दरम्यान संगीत क्षेत्रातील दिग्गज जोडी अजय-अतुल यांनी चित्रपटाला संगीत दिलं आहे. खाशाबा यांच्या भूमिकेसाठी ऑडिशनच्या कठोर निवड प्रक्रियेनंतर एका नव्या चेहऱ्याची निवड करण्यात आली आहे. हा नवा चेहरा कोण आहे, त्याची घोषणा लवकरच करण्यात येईल. या नवोदित कलाकारासोबत जितेंद्र जोशी, महेश मांजरेकर, गिरीश कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, संदेश कुलकर्णी, सुरेश विश्वकर्मा, वैभव मांगले, छाया कदम, आणि गार्गी कुलकर्णी यांसारख्या एकापेक्षा एक दमदार कलाकारांचा सहभाग आहे.जिओ स्टुडिओज आणि आटपाट प्रॉडक्शन्स प्रस्तुत 'खाशाबा' या चित्रपटाची निर्मिती ज्योती देशपांडे आणि गार्गी कुलकर्णी यांनी केली असून दिग्दर्शन नागराज मंजुळे यांचं आहे.

'खाशाबा' हा चित्रपट १ जानेवारी २०२७ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यास सज्ज आहे.

## मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत क्रीडा मार्गदर्शकांच्या मुलाखती ७ जुलैला

**दि.०२, बुलढाणा :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'मिशन लक्ष्यवेध' योजनेअंतर्गत बुलढाणा येथे जिल्हास्तरीय क्रीडा निपुणता केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. या केंद्रासाठी वेटलिफ्टिंग व मैदानी (ॲथलेटिक्स) क्रीडा प्रकारांसाठी क्रीडा मार्गदर्शकांच्या निवडीसाठी मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे प्रस्तावित निवासी क्रीडा निपुणता केंद्रामध्ये निवड झालेल्या खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, अल्पोपहार तसेच क्रीडा विज्ञानाशी संबंधित विविध सुविधा शासनाच्या मान्यतेनुसार उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणी आयोजित करण्यात येणार असून त्यासाठी पात्र प्रशिक्षकांची निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

इच्छुक व पात्र क्रीडा मार्गदर्शकांनी आवश्यक कागदपत्रांसह दि. ७ जुलै २०२६ रोजी दुपारी १ वाजेपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. क्रीडा मार्गदर्शक पदासाठी उमेदवार किमान मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असणे आवश्यक असून बी.पी.एड., एम.पी.एड. किंवा क्रीडा विज्ञानातील पदवीधारकांना प्राधान्य दिले जाणार आहे. संबंधित क्रीडा प्रकारातील एनएसएनआयएस डिप्लोमा इन कोचिंग किंवा समतुल्य प्रशिक्षण पात्रता अनिवार्य आहे. तसेच राज्यस्तरावरील किमान एक वर्षाचा प्रशिक्षणाचा अनुभव, वय २१ ते ४५ वर्षे, मराठी भाषेचे ज्ञान, मूलभूत संगणक कौशल्ये आणि शासन मान्यताप्राप्त वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पदक विजेत्या खेळाडूंना तसेच गुणवंत खेळाडूंना प्रशिक्षण देण्याचा अनुभव असलेल्या प्रशिक्षकांना प्राधान्य दिले जाणार आहे.


जिल्ह्यातील पात्र व अनुभवी क्रीडा प्रशिक्षकांनी या संधीचा लाभ घेऊन नियोजित वेळेत मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा कार्यालयाने केले आहे.

## विद्यार्थ्यांना दर्जेदार गणवेश मिळाले पाहिजे : आमदार काशिनाथ दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना दर्जेदार शालेय गणवेश, बूट आणि पायमोजे उपलब्ध व्हावेत, तसेच वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर मोफत शालेय गणवेश योजनेतील आर्थिक तरतूद वाढविण्यात यावी, असी आग्रही मागणी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी प्रश्न उपस्थित करत आ. दाते यांनी शासनाचे लक्ष वेधले.

यावर बोलताना आमदार दाते यांनी केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या मोफत शालेय गणवेश योजनेत प्रति विद्यार्थी दोन गणवेश, बूट व पायमोजे देण्यासाठी करण्यात आलेली आर्थिक तरतूद वाढत्या महागाईच्या तुलनेत अपुरी पडत असल्याचा मुद्दा मांडला. कमी




निधीमुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्य मिळण्यात अडचणी निर्माण होत असून, पालकांकडून निधी वाढविण्याची मागणी सातत्याने होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

यासोबतच, विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या दर्जाचे गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी प्रति विद्यार्थी आर्थिक तरतूद वाढविणे, निधी वितरण प्रक्रियेत सुधारणा करणे आणि शालेय गणवेश योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासन कोणती पावले उचलत आहे, अशी विचारणा त्यांनी केली.

यावर उत्तर देताना शालेय शिक्षण राज्यमंत्री दादाजी भुसे यांनी शासनाने ६ जुलै २०२३ च्या निर्णयानुसार प्रति विद्यार्थी दोन गणवेशांसाठी ₹६०० तसेच एक जोडी बूट व दोन जोड पायमोज्यांसाठी ₹१७० इतकी आर्थिक तरतूद निश्चित केल्याची माहिती दिली. तसेच, २१ मे २०२६ च्या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या अनुदानाव्यतिरिक्त शाळा व्यवस्थापन समित्यांनी लोकसहभाग अथवा CSR निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.




## जिथे सत्ता तिथे लत्ता

राज्यात काँग्रेसची सत्ता असताना गटबाजीचे जोरदार प्रदर्शन घडायचे. ते आताही घडते. आपसातील वादविवादांचे काँग्रेस नेते 'लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण,' अशा शब्दांत समर्थन करत. 'जिथे सत्ता असते तिथे लाथा असतातच' ही वस्तुस्थिती खासगीत सांगत. अतिलोकशाहीने त्यांची सत्ता नेली. काँग्रेसमधील लाथाळ्या बघणाऱ्यांना त्या वेळी भाजपच्या शिस्तीचे, निर्णयक्षमतेचे कौतुक असे. पण, कधी काळी निर्णयक्षमतेसाठी व कठोर शिस्तीसाठी ओळखल्या जाणाऱ्या भाजपमध्ये लवकर निर्णय न होणे, श्रेष्ठींच्या निर्णयास विरोध, निर्णय बदलविण्याचा प्रयत्न, संघटनेवर दबाव आणि झालेल्या निर्णयास स्थगिती मिळविणे असे प्रकार सुरू झाले आहेत. सत्तेचा समुद्र खवळल्यावर वेगवेगळे प्रवाह त्यात मिसळतात. काही चांगले, काही वाईट. त्यांना चाळणी लावणे कठीण. तसेच काहीसे भाजपचे झालेले दिसते.

मागील दोन दिवसांत विदर्भातील भाजपमध्ये दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. एक अमरावतीत आणि दुसरी चंद्रपुरात. अमरावतीच्या शहराध्यक्षपदावरून डॉ. नितीन धांडे यांची उचलबांगडी करीत नितीन गुडधे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्याचे जोरदार स्वागत झाले. होर्डिंग लागले. बॅनर झळकले. मात्र, अवघ्या चोवीस तासांत गुडधेंच्या नियुक्तीला स्थगिती मिळाली.

वरकरणी हा धांडे विरुद्ध गुडधे असा वाद दिसत असला तरी त्यामागे राणा दाम्पत्य विरुद्ध भाजपचे डॉ. अनिल बोंडे, प्रवीण पोटे आणि राजेश वानखेडे ही तिकडी असा संघर्ष आहे. सगळ्या पक्षांचा धांडोळा घेऊन आलेले धांडे शहराध्यक्ष असताना अमरावती महापालिकेत भाजपचे नगरसेवक घटले आणि राणांच्या युवा स्वाभिमानीचे वाढले. धांडेंचा स्वाभिमान भाजपपेक्षा 'युवा'कडे झुकता दिसल्याने त्यांना बदलण्याची मागणी वाढली. त्यातूनच आमदार राजेश वानखेडे यांचे भाचे नितीन गुडधे यांना शहराध्यक्ष केले. गुडधेंचे भाजपमधील वय अल्प असताना त्यांना अचानक अध्यक्ष करावे हे पक्षातील काहींना रुचले नाही; राणांना तर नाहीच नाही! त्यातून फिरायची ती चक्रे फिरली. गुडधे स्वागताचे हारतुरे स्वीकारत असतानाच, त्यांच्या हाती नियुक्तीच्या स्थगितीचे पत्र पडले. अचानक हटविल्याने धांडे नाराज. नियुक्तीकरून स्थगिती दिल्याने गुडधे दु:खी.

प्रदूषणात आघाडीवर असलेल्या चंद्रपुरात राजकीय प्रदूषणही मोठे आहे. गटबाजीला पूर आला आहे. जुने भाजपचे असलेले आणि इतर काही पक्षांचे पाणी चाखून आलेले चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार आणि भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार या दोघांतील संघर्ष टोकाला गेला आहे. एकमेकांना विरोध करण्याची एकही संधी ते सोडत नाहीत. पक्षाच्या पातळीवर तर नाहीच नाही, सरसंघचालकांच्या कार्यक्रमातही नाही. त्यावर तोडगा म्हणून श्रेष्ठींनी संघटना दोघांमध्ये सारखी वाटली. शहराचे अध्यक्षपद जोरगेवार गटाला तर ग्रामीणचे अध्यक्षपद मुनगंटीवार गटाला दिले. ग्रामीणचे अध्यक्ष शर्मा यांनी कार्यकारिणी केली. नवी पदे मिळालेल्या पदाधिकाऱ्यांनी कौतुक मिरवून घेतले. होर्डिंग-बॅनर लागले. सोशल मीडियाची हौसमौज सुरू असतानाच, त्या कार्यकारिणीस प्रदेश भाजपने स्थगिती दिली. कार्यकारिणी सर्वसमावेशक नाही, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहिर यांच्यासारख्या इतर नेत्यांचे समर्थक त्या यादीत नाहीत, ग्रामीणची कार्यकारिणी असतानाही, पदाधिकाऱ्यांच्या यादीत ४०हून अधिक नावे ही शहरी कार्यकर्त्यांची आहेत, असे आरोप झाले.

संघटनेचे वय वाढते तसे वादही वाढतात. ती छोटी असते तेव्हा लोक कमी असतात. संवाद अधिक असतो. समन्वयाने काम चालते. १९९७पर्यंत भाजपमध्ये वॉर्डातील अध्यक्ष मतदानाने निवडीत. शहराध्यक्षासाठी निवडणूक होई, आता एकमताने होतात. आधी ज्या शहरातील पदाधिकारी त्या शहरात निवडले जात. आता मुंबईतून ठरतात. उद्या कदाचित दिल्लीतही ठरतील. सत्तेच्या रस्त्यावरून धावताना संघटनेची गाडी अशीच पळत असावी बहुदा

**- अतुल पांडे**

# बळीराजाला देतेय बळ...

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६

महाराष्ट्रातील बळीराजाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि त्याला पुन्हा एकदा स्वाभिमानाने उभे करण्यासाठी राज्य शासनाने नुकतेच ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना जाहीर करण्यात आली असून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' असे या योजनेचे नाव आहे. या योजनेमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**३६ हजार कोटींपेक्षा अधिक रकमेची कर्जमुक्ती...**

या योजनेच्या माध्यमातून राज्य शासनाने तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी मंजूर केली आहे. या अवाढव्य आर्थिक तरतुदीमुळे राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार आहे. शेतकऱ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी आणि शेती क्षेत्राला गती देण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

**योजनेचे मुख्य निकष आणि लाभ**

**२ लाखांपर्यंत कर्जमाफी :** ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ज्या पात्र शेतकऱ्यांचे पीक कर्ज थकीत आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती दिली जाणार आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन :** जे शेतकरी प्रामाणिकपणे आणि वेळेवर आपल्या कर्जाची परतफेड करतात, त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून शासनाने विशेष तरतूद केली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.




**नव्याने पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा :** जुन्या कर्जाच्या बोज्यातून मुक्त झाल्यानंतर, शेतकऱ्यांना आता खरीप आणि रब्बी हंगामासाठी नव्याने पीक कर्ज मिळणे अत्यंत सोपे होणार आहे.

**जमीनधारणेची अट नाही :** या योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लाभ देताना 'वैयक्तिक शेतकरी' हाच एकमेव निकष मानला गेला आहे. जमीनधारणेचा (जमिनीच्या क्षेत्राचा) कोणताही विचार न करता प्रत्येक पात्र शेतकऱ्याला या योजनेचा लाभ दिला जाईल.

**सुलभ प्रक्रिया :** स्वतंत्र अर्जाची गरज नाही!

शेतकऱ्यांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत म्हणून शासनाने प्रक्रिया अत्यंत सुलभ ठेवली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना कोणताही स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही. फक्त आधार प्रमाणीकरण (अरवहरॲ अींहशपींळलरींळेप) पूर्ण करणे बंधनकारक असेल. आधार प्रमाणीकरण होताच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमुक्तीचा लाभ वर्ग केला जाईल.

**प्रभावी अंमलबजावणीसाठी उपसमितीची स्थापना...**

योजनेचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पारदर्शकपणे आणि वेळेत पोहोचावा, यासाठी एका विशेष उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आणि आवश्यकतेनुसार तातडीने निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार या उपसमितीला देण्यात आले आहेत.

आर्थिक अडचणींमुळे खचलेल्या शेतकऱ्याला पुन्हा एकदा शेतात आत्मविश्वासाने उभे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' मुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांची चिंता मिटली असून, बळीराजा पुन्हा एकदा नव्याने समृद्धीच्या वाटेवर वाटचाल करण्यास सज्ज झाला आहे.

**- मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती आधिकारी, ठाणे**

# प्लास्टिक एक सोय आहे, पण ते अनमोल जीवनापेक्षा महत्त्वाचे नाही

निसर्ग आणि सजीवसृष्टी हे एकमेकांचे पूरक आहेत. मानवाने आपल्या बुद्धिमत्तेच्या, संशोधनाच्या आणि तांत्रिक प्रगतीच्या बळावर जीवन अधिक सोयीस्कर करण्यासाठी अनेक उपयुक्त वस्तूंची निर्मिती केली. या शोधांमुळे मानवी जीवन निश्चितच अधिक सुलभ झाले, परंतु वाढत्या भौतिक गरजा आणि स्वार्थामुळे मानवाला निसर्गाचे अंधाधुंद शोषण करण्याची प्रवृत्तीही वाढली. परिणामी, जी साधने एकेकाळी सोयीची मानली जात होती, तीच आज मानव आणि पर्यावरणासाठी गंभीर संकटाचे कारण ठरत आहेत. प्लास्टिक हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. आज परिस्थिती इतकी चिंताजनक झाली आहे की, आपल्याला मृत्यूसाठी कोणत्याही शस्त्राची गरज उरलेली नाही. आपणच निर्माण केलेले प्रदूषण, भेसळ, नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर आणि प्लास्टिकचा अनियंत्रित वापर यांमुळे अनेक गंभीर आजार उद्भवत असून अकाली मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. प्लास्टिकने केवळ पर्यावरणालाच नाही, तर मानवी आरोग्यालाही गंभीरपणे प्रभावित केले आहे.

### अनभिषिक्त

बोलणे असो मुद्देसूद
वक्त्याने व्हावे व्यक्त
शब्दांचीजाणे किंमत
विचार मांडायचे मुक्त

अर्थ पूर्ण बोलण्यांनी
जिव्हा अधिकसशक्त
मंत्र मुग्ध कान करता
श्रोते होतील आसक्त

शब्दांतअग्नी पेटवता
उसळून येई पहा रक्त
वाचा हत्यार धारधार
हादरून टाकेल तख्त

मोजा मापा अक्षरांना
बोलूनकांत अतिरिक्त
पुढील पावलाकरिता
काहीतरी ठेवावे रिक्त

जिंकावे कृति उक्तीत
श्रोत्यांस करे अनुरक्त
प्रवक्ता चफखलबोले
सहज होई अत्यासक्त

केवळ शब्दांच्यातोफे
सुप्तही होणार उद्युक्त
पेटून उठतील अंगारा
भाषणअसावे उद्रिक्त

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

प्लास्टिकची सर्वात मोठी समस्या म्हणजे ते नैसर्गिकरीत्या अतिशय दीर्घकाळ नष्ट होत नाही. एकदा वापरल्यानंतर ते शेकडो नव्हे, तर जवळपास हजार वर्षांपर्यंत पर्यावरणात टिकून राहू शकते. कालांतराने ते विघटित होऊन मायक्रोप्लास्टिक आणि नॅनोप्लास्टिकमध्ये रूपांतरित होते. हे सूक्ष्म कण माती, पाणी आणि हवेच्या माध्यमातून संपूर्ण अन्नसाखळीत प्रवेश करतात. वैज्ञानिक संशोधनांमध्ये मानवी मेंदू, रक्त, फुफ्फुसे, गर्भातील बाळ तसेच विविध सजीवांच्या शरीरातही प्लास्टिकचे सूक्ष्म कण आढळल्याची पुष्टी झाली आहे. ही बाब भविष्यासाठी अत्यंत गंभीर इशारा आहे.

आपण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दररोज अन्न आणि पाण्यासोबत प्लास्टिकचे सूक्ष्म कण शरीरात घेत आहोत. प्लास्टिकचा कचरा पचवता येत नाही. अनेक प्राणी आणि पक्षी प्लास्टिकच्या पिशव्या किंवा इतर प्लास्टिक वस्तू अन्न समजून गिळतात, त्यामुळे त्यांचा मृत्यूही होतो. नद्या, समुद्र आणि जंगलेही प्लास्टिक प्रदूषणामुळे सातत्याने प्रभावित होत आहेत. प्लास्टिक जाळल्यावर निर्माण होणारे विषारी वायू हवेचे प्रदूषण वाढवतात, तर जमिनीत पडून राहिलेल्या प्लास्टिक मधून निर्माण होणारे वायू हवामान बदल आणि जैवविविधतेसाठी धोकादायक ठरत आहेत. प्लास्टिकमध्ये असलेली रासायनिक द्रव्ये हार्मोन्सचे असंतुलन, प्रजननाशी संबंधित समस्या, हृदयविकार, थायरॉईडचे विकार, मधुमेह, श्वसनाचे आजार तसेच कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढवतात. प्लास्टिक उद्योगात काम करणाऱ्या कामगारांमध्ये फुफ्फुसांच्या आजारांचे प्रमाणही अधिक आढळते. त्यामुळे प्लास्टिक प्रदूषण ही आता केवळ पर्यावरणीय समस्या राहिलेली नसून, ती जागतिक सार्वजनिक आरोग्य संकट बनली आहे.

दरवर्षी ३ जुलै रोजी संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश लोकांना एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांच्या दुष्परिणामांविषयी जागरूक करणे आणि पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यासाठी प्रेरित करणे हा आहे. हा दिवस केवळ प्रतीकात्मक नसून पृथ्वी, पर्यावरण आणि भावी पिढ्यांचे संरक्षण करण्यासाठीचा जागतिक उपक्रम आहे. जर आपण आजच प्लास्टिकवरील अवलंबित्व कमी केले नाही, तर भविष्यात त्याचे परिणाम अधिक भयावह स्वरूप धारण करू शकतात.

भारतात दरवर्षी सुमारे ५.५ दशलक्ष टन सिंगल-यूज प्लास्टिक कचरा निर्माण होतो. सरासरी प्रत्येक भारतीय नागरिक वर्षभरात सुमारे ११ किलोग्रॅम



प्लास्टिकचा वापर करतो. यामध्ये कॅरी बॅग, पॅकेजिंग साहित्य आणि दैनंदिन वापरातील इतर प्लास्टिक वस्तूंचा समावेश असतो. यापैकी जवळपास ४ किलोग्रॅम प्लास्टिक हे केवळ सिंगल-यूज प्लास्टिक असते. देशात निर्माण होणाऱ्या सुमारे ९.३ दशलक्ष टन प्लास्टिक कचऱ्यापैकी ४३ टक्क्यांहून अधिक भाग सिंगल-यूज प्लास्टिकचा आहे. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे यापैकी जवळपास १९ टक्के प्लास्टिक कचरा संकलितही होत नाही आणि तो उघड्यावर विखुरला जाऊन माती, जलस्रोत आणि वन्यजीवांना मोठे नुकसान पोहोचवतो. चीन आणि अमेरिकेनंतर भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा सिंगल-यूज प्लास्टिक कचरा निर्माण करणारा देश आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने अनेक नियम लागू केले असले तरी अनेक ठिकाणी बंदी घालण्यात आलेल्या प्लास्टिकचा वापर आजही सुरू आहे. दक्षिण आशियात सर्वाधिक घनकचरा निर्माण करणारे राज्य म्हणून महाराष्ट्र ओळखला जाऊ लागला आहे. दुसरीकडे, समुद्रकिनारे आणि पर्यटनस्थळांसाठी प्रसिद्ध असलेल्या केरळमध्येही दरवर्षी १,३०,००० टनांहून अधिक प्लास्टिक कचरा निर्माण होतो, त्यापैकी केवळ सुमारे ३ टक्के कचऱ्याचेच पुनर्चक्रण केले जाते.

आपल्या देशातील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक म्हणजे पर्यावरणाबाबत वाढत चाललेली निष्काळजी वृत्ती आणि बेफिकिरी. फारच कमी लोक एखाद्या विषयाची संपूर्ण माहिती घेण्याचा प्रयत्न करतात, तर बहुतेक लोक विचार न करता इतरांचे अनुकरण करत राहतात. जेव्हा वैयक्तिक सोयीला सामाजिक आणि पर्यावरणीय हितापेक्षा अधिक महत्त्व दिले जाते, तेव्हा त्याचे दुष्परिणाम संपूर्ण समाजाला आणि भावी पिढ्यांना भोगावे लागतात. प्लास्टिक प्रदूषण हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. आजही बंदी लागू असतानाही बाजारपेठांमध्ये प्लास्टिकच्या पिशव्यांचा सर्रास वापर होताना दिसतो. अनेक वेळा दुकानदार नकार देतात, तरीही ग्राहक स्वतः प्लास्टिकच्या पिशव्यांची मागणी करतात. प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंच्या बाबतीतही हीच परिस्थिती आहे. हे केवळ नियमांचे उल्लंघन नाही, तर पर्यावरण आणि मानवी आरोग्याविषयीच्या आपल्या बेजबाबदार मानसिकतेचेही द्योतक आहे. त्याचप्रमाणे, रस्त्याच्या कडेला कचरा टाकण्याची सवय हळूहळू मोठ्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमध्ये रूपांतरित होते. अशा प्रकाराला विरोध केला किंवा रोखण्याचा प्रयत्न केला, तर अनेकदा वाद निर्माण होतात.

पूर्वी गंभीर आजार प्रामुख्याने व्यसनाधीनता किंवा चुकीच्या जीवनशैलीमुळे होत असत. परंतु आता प्रदूषण आणि पर्यावरणाविषयीची निष्काळजी वृत्ती यांमुळे लहान मुले, निरोगी व्यक्ती आणि कोणतेही व्यसन नसलेले लोकही गंभीर आजारांना बळी पडत आहेत. दुभती जनावरे प्लास्टिकच्या पिशव्या गिळतात, सागरी जीव प्लास्टिकच्या कचऱ्यात अडकतात आणि पक्षी प्लास्टिकला अन्न समजून खातात. त्यानंतर या प्राण्यांचे दूध, मांस किंवा इतर उत्पादने मानवी आहाराचा भाग बनतात आणि अशा प्रकारे प्लास्टिकचे सूक्ष्म कण आपल्या अन्नसाखळीत प्रवेश करतात. आज बाजारात जवळपास सर्व प्रकारची प्लास्टिकची भांडी उपलब्ध आहेत. विशेषतः गरम अन्न आणि गरम पेयांसाठी प्लास्टिकचा वापर आरोग्यासाठी अत्यंत घातक मानला जातो, कारण प्लास्टिक मधील हानिकारक रसायने अन्नामध्ये मिसळू शकतात. त्यामुळे कर्करोगासह अनेक गंभीर आजारांच्या रुग्णसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. आज देशातील जवळपास प्रत्येक गल्ली, परिसर, नातेवाईक किंवा परिचितांमध्ये कर्करोगाचा एखादा रुग्ण आढळतो, ही अत्यंत चिंतेची बाब आहे.

जर आपल्याला आपला देश, समाज आणि पर्यावरण सुरक्षित ठेवायचे असेल, तर बदलाची सुरुवात स्वतःपासून करावी लागेल. पर्यावरण संरक्षण ही केवळ सरकार किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. कापडी किंवा ज्यूटच्या पिशव्यांचा वापर करणे, सिंगल-यूज प्लास्टिक टाळणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि पर्यावरणविषयक कायद्यांचे काटेकोर पालन करणे या गोष्टी आपल्या दैनंदिन सवयींचा भाग व्हायला हव्यात. निसर्ग आपल्याला शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि जीवनासाठी आवश्यक असलेली सर्व संसाधने विनामूल्य उपलब्ध करून देतो. त्यामुळे त्यांचे संरक्षण करणे हेही आपले कर्तव्य आहे. जर आपण आज जागरूक झालो नाही, तर त्याची मोठी किंमत भावी पिढ्यांना मोजावी लागेल. प्लास्टिक हे केवळ एक सोयीचे साधन आहे; परंतु मानवी जीवन आणि पर्यावरण त्यापेक्षा कितीतरी अधिक मौल्यवान आहेत. जीवन एकदाच मिळते, त्याचे महत्त्व ओळखा. प्रदूषणाच्या माध्यमातून स्वतःसह इतरांच्या जीवनालाही धोका निर्माण करणे हे अयोग्यच नव्हे, तर गंभीर गुन्हा आहे. म्हणूनच, आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवीमुक्त दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी असा संकल्प करूया की, प्लास्टिकवरील आपले अवलंबित्व कमी करू, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारू आणि स्वच्छ, निरोगी तसेच सुरक्षित भविष्य घडविण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवू.

**लेखक - डॉ. प्रितम भि. गेडाम**
**मोबाईल - ०८२३७४ १७०४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# खोट्या प्रतिष्ठेच्या आड दडलेला दांभिकपणा...

**अक्षराज : रघुनाथ थोरात**

**दि.०२, उंब्रज :** गावपातळीवरील राजकारणात आजकाल काही व्यक्ती स्वतःला समाजसेवक, गावहितचिंतक आणि नैतिकतेचे पुरस्कर्ते म्हणून मिरवताना दिसतात. सार्वजनिक कार्यक्रम, लग्नसमारंभ, अंत्यविधी किंवा धार्मिक कार्य असो, प्रत्येक ठिकाणी स्वतःची उपस्थिती आणि महत्त्व अधोरेखित करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू असतो. मात्र समाजात प्रतिष्ठा ही केवळ पैसा, प्रभाव किंवा दिखाऊ वर्तनाने मिळत नसून ती चारित्र्य, प्रामाणिकपणा आणि लोकांप्रती असलेल्या आदरातून मिळते.काही वेळा व्यक्ती आपल्या भूतकाळाकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करून नैतिकतेचे धडे देऊ लागतात. स्वतःच्या चुका, वादग्रस्त वर्तन किंवा समाजात निर्माण झालेल्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत इतरांना उपदेश करण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. अशा दुटप्पी भूमिकेमुळे समाजात विश्वास कमी होतो.गावातील राजकारण हे विकासाभोवती फिरण्याऐवजी व्यक्तिपूजा, अहंकार आणि प्रतिष्ठेच्या स्पर्धेत अडकत चालले आहे. मीच सर्वश्रेष्ठ, माझ्याशिवाय गावात काही होत नाही अशी मानसिकता लोकशाहीला घातक ठरू शकते. लोकप्रतिनिधी किंवा सामाजिक कार्यकर्ता म्हणून वावरणाऱ्या प्रत्येकाने नम्रता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व जपणे आवश्यक आहे.

समाज शेवटी व्यक्तीच्या शब्दांपेक्षा तिच्या कृतींचे मूल्यमापन करतो. त्यामुळे खऱ्या अर्थाने प्रतिष्ठा मिळवायची असेल तर ती समाजसेवा, प्रामाणिक वर्तन आणि लोकांचा विश्वास जिंकूनच मिळते; दिखाऊपणा, अहंकार किंवा स्वतःची प्रतिमा उभी करण्याच्या प्रयत्नांतून नव्हे...

# श्री संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी प्रस्थान सोहळा निमित्त

## 'पसायदान मंच' येथे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, आळंदी (पुणे) :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळा–२०२६ निमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी, भाविक व पर्यटक पंढरपूरकडे पायी प्रस्थान करण्यासाठी सालाबादप्रमाणे संतनगरी श्री क्षेत्र आळंदी येथे दाखल होणार आहेत.

या पालखी प्रस्थान सोहळ्याचे औचित्य साधून श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समिती, आळंदी नगरपरिषद व आळंदीकर नागरिक यांच्या संयुक्त विद्यमाने इंद्रायणी नदीच्या हवेली बाजू घाटावरील भव्य 'पसायदान मंच' येथे दि. ०६ जुलै ते ०८ जुलै २०२६ या कालावधीत विविध धार्मिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक व प्रबोधनपर



कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती नगराध्यक्ष प्रशांत कु–हाडे व मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी दिली.

या ३ दिवसांच्या कार्यक्रमांमध्ये वारकरी संप्रदायाच्या भक्तिमय परंपरेचा अनुभव देणारे कीर्तन, प्रवचन, भजन, भारूड, हरिपाठ, तसेच ऐतिहासिक, पौराणिक आणि संगीतप्रधान सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत. याशिवाय महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती, अध्यात्म, परंपरा आणि लोककलेचे दर्शन घडविणारे विविध दर्जेदार कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

वारकरी, भाविक आणि नागरिकांना अखंड भक्तिरसाचा आनंद मिळावा, अध्यात्मिक वातावरणात समाधानाची अनुभूती यावी तसेच समाजप्रबोधनाचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचावा हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समिती, आळंदी नगरपरिषद व आळंदीकर नागरिक यांच्या वतीने सर्व वारकरी, भाविक, नागरिक तसेच पर्यटकांनी या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून अध्यात्मिक सायंकाळी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पालम तालुका केमिस्ट अँड ड्रगीस्ट असोशीयनच्या अध्यक्षपदी अमोल रोकडे यांची निवड



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०२ पालम (परभणी) :** पालम तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनची काल सायंकाळी बैठक पार पडली असून त्यात नवीन तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली. तालुकाध्यक्ष पदी अमोल माणिकराव रोकडे यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीत सचिवपदी हनुमान वडजे, उपाध्यक्षपदी गजानन स्वामी व सिताराम कवठेकर यांची तर कोषाध्यक्षपदी अनिल पौळ, सहसचिवपदी इरफान खान पठाण यांची बिनविरोध निवड झाली. याशिवाय किरण सिरस्कर, राहुल स्वामी यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

या बैठकीस परभणी जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संजय मंत्री, उपाध्यक्ष नितीन चिद्रावार, सचिव दत्तात्रय गाडगे, नगरसेवक लक्ष्मण रोकडे , सुरेश चव्हाण, गणेश सिरस्कर, रुपेश शिनगारे, गजानन शिनगारे, संजय गडम, सतीश दरक, जुबेरभाई, इस्रायलभाई, अ‍ॅड. ओमकार सिरस्कर यांच्यासह पालम तालुक्यातील केमिस्ट अँड ड्रगिस्ट बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनिर्वाचित अध्यक्ष अमोल रोकडे यांनी औषध विक्रेत्यांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य देत संघटना अधिक सक्षम, सक्रिय आणि प्रभावी करण्यासाठी सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

दरम्यान, अमोल रोकडे यांच्या बिनविरोध निवडीचे तालुकाभरातून स्वागत होत असून विविध सामाजिक, व्यापारी व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत काळवीट गंभीर जखमी

## पोलीस व नागरिकांच्या तत्परतेमुळे बचाव, वन विभागाच्या उदासीनतेवर प्रश्नचिन्ह

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०२, चारठाणा :** नांदेड–छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील चारठाणा–पिंपरी गीते सीमेवर गुरुवारी (दि.०२ जुलै) सायंकाळी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास अज्ञात वाहनाच्या धडकेत एक काळवीट गंभीर जखमी झाले. मात्र, पोलीस कर्मचारी आणि पशुप्रेमी नागरिकांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे काळवीटाचे प्राण वाचले. या घटनेत वन विभाग आणि पशुवैद्यकीय विभागाच्या उदासीन कारभाराचा प्रत्यय आल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अपघातानंतर काळवीट रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत पडले होते. त्याचवेळी भटक्या कुत्र्यांनी त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. ही बाब लक्षात येताच चारठाणा पोलीस ठाण्याचे कर्मचारी चव्हाण तसेच शेतकरी भागवत अंभोरे, भागवत गीते आणि प्रभाकर कुऱ्हे यांनी घटनास्थळी धाव घेत कुत्र्यांच्या तावडीतून काळवीटाची सुटका केली आणि त्याला सुरक्षित ठिकाणी हलविले.

यानंतर जखमी काळवीटावर उपचारासाठी नागरिकांनी चारठाणा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधला. मात्र, तेथे एकही कर्मचारी उपस्थित नसल्याचे आढळले. त्यानंतर जिंतूर येथील वन विभागाचे अधिकारी जाधव आणि बुचाले यांच्याशी संपर्क साधला असता, आम्ही बैठकीसाठी बाहेर आहोत, गाडी घेऊन तात्काळ येतो, असे सांगण्यात आले. मात्र, तब्बल दोन तास उलटूनही अधिकारी घटनास्थळी पोहोचले नाहीत.

दरम्यान, वन मजूर पांडुरंग वाघ



घटनास्थळी दाखल झाले. अखेर नागरिकांनीच पुढाकार घेत जखमी काळवीटाला वाहनातून चारठाणा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात दाखल करून उपचाराची व्यवस्था केली.

या घटनेत एकीकडे पोलीस कर्मचारी आणि नागरिकांनी माणुसकीचे दर्शन घडवत वन्यजीवाचे प्राण वाचवले, तर दुसरीकडे पशुवैद्यकीय दवाखान्यातील कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांचा बेजबाबदारपणा समोर आला. वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी संबंधित विभागांनी अधिक जबाबदारीने काम करावे आणि अशा घटनांमध्ये तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ममता विद्यालयात निवृत्त कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न

## बळीराजा परिवारातील मान्यवरांची उपस्थिती...



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०२ पालम (परभणी) :** पालम येथील ममता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सेवापूर्ती सोहळा मोठया उत्सहात संपन्न झाला. या सेवापूर्ती सोहळ्यामध्ये निवृत्त कर्मचारी प्राचार्य अंभोरे एस.एम, प्रा.पवार बी.टी, प्रा.मोरे बी.बी, प्रा. राठोड पी.एस, पतंगे एस बी, सोपान ठाकरे या बळीराजा शिक्षण संस्थेतील ६ निवृत्त कर्मचाऱ्यांना निरोप देण्यात आला. या सेवापूर्तीच्या सत्काराला उत्तर देतानी प्राचार्य अंभोरे एस एम, प्रा. मोरे बीबी, प्रा.पवार बीटी, सोपान ठाकरे यांनी आपल्या संस्थेबद्दल आणि गोळेगावकर कुटुंबाविषयी असलेला जिव्हाळा आणि कठीण परिस्थितीत गोळेगावकर कुटुंबाने दिलेला मदतीचा हात याविषयी आपल्या हृदयद्रावक भावना व्यक्त केल्या आणि राष्ट्रीयरत्न भाई लक्ष्मणरावजी गोळेगावकर यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या जीवनातील काही प्रसंग सांगून त्यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त केला. याप्रसंगी सर्व कर्मचाऱ्यांना आहेर व भेटवस्तू आणि शाल श्रीफळ देऊन सपत्नीक सत्कार करण्यात.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बळीराजा शिक्षण संस्थेच्या ज्येष्ठ संचलिका चित्राताई गोळेगावकर या होत्या. व प्रमुख पाहुणे बळीराजा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक तुषार गोळेगावकर होते.

तसेच या कार्यक्रमासाठी बळीराजाची संस्थेचे सचिव डॉक्टर संतराम येलमोटे, संचालक अ‍ॅड.गोविंदराव आळनुरे, संस्थेचे कोषाध्यक्ष माननीय दिलीपराव गोळेगावकर, सहसचिव मनुताई देसाई, आरखेडच्या सरपंच अक्षयाताई गोळेगावकर, संचालक भास्करराव सिरस्कर, माजी प्राचार्य क्षीरसागर आर. के, माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आत्माराम जी आरसुळे, मीनाताई कदम, तेजस्विनी आरसुळे, प्रशासकीय अधिकारी गिरीश सोळंके, माणिकराव जाधव, प्रा.कामाजी जाधव, डॉ.अशोक जाधव, रंगराव भोसले माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती ताडकळस बालाजी रुद्रवार, सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती ताडकळस ज्ञानोबा घोडके, दिलीपराव अंभोरे,अंकुशराव शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी अध्यक्ष तुषार गोळेगावकर यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ममता विद्यालयाचे उपप्राचार्य दुधाटे आर.जी यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पौळ जी.डी. व प्रा. मस्के डी.आर.यांनी केले. तर आभार खांडेकर ए.आर.यांनी मानले. या कार्यक्रमासाठी ममता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व कर्मचारी श्री बळीराजा शिक्षण संस्थेतील अनेक कर्मचारी सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे नातेवाईक आणि मित्रमंडळी तसेच शहरातील आणि पंचक्रोशीतीलअनेक मान्यवर उपस्थित होते.

# ठाणे महापालिकेचा मोठा दणका: अतिक्रमण विभागातील ११६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

## हजर न झाल्यास शिस्तभंगाची कारवाई; आयुक्त सौरभ राव यांचा इशारा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०१, ठाणे :** शहरातील वाढते अतिक्रमण, फेरीवाले आणि अनधिकृत व्यवसायांवर अधिक प्रभावी व पारदर्शक कारवाई करण्यासाठी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी मोठा निर्णय घेतला आहे. प्रभाग स्तरावरील अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागात कार्यरत ११६ कर्मचाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या करण्याचे आदेश आज निर्गमित केले.

**'हजर न झाल्यास शिस्तभंग' – आयुक्तांचा इशारा**

बदली झालेल्या ठिकाणी कर्मचारी विनाविलंब हजर व्हावेत. आदेशाचे पालन न करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा आयुक्त सौरभ राव यांनी दिला आहे. सर्व कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.



**का घेतला निर्णय?**

शहरातील विविध भागांत अतिक्रमणांविरोधात कठोर आणि नियमित कारवाई करण्याची मागणी नागरिक, लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांकडून सातत्याने होत होती. अनेक कर्मचारी दीर्घकाळ एकाच प्रभागात कार्यरत असल्याने मोहिमांमध्ये सातत्य व परिणामकारकता दिसत नव्हती. या तक्रारींचा आढावा घेत प्रशासनाने हा निर्णय घेतला.

**कोणाच्या बदल्या?**

नऊ प्रभाग समित्यांमधील अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागात कार्यरत वरिष्ठ लिपिक, लिपिक, शिपाई, बिगारी आणि सफाई कर्मचारी अशा विविध पदांवरील एकूण ११६ कर्मचाऱ्यांचा यात समावेश आहे.

**कारवाईला मिळणार बळ :** या बदल्यांमुळे प्रभाग स्तरावरील अतिक्रमण नियंत्रण यंत्रणेला बळ मिळणार असून फेरीवाले, हातगाडीधारक आणि इतर अनधिकृत अतिक्रमणांवर अधिक प्रभावीपणे कारवाई करता येणार आहे. अतिक्रमणमुक्त रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागा उपलब्ध करून देण्याच्या महापालिकेच्या प्रयत्नांना गती मिळेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# शासन परिपत्रकाला केराची टोपली दाखवणाऱ्या खाजगी शाळांवर कारवाईची मागणी

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.०२, शहापूर (ठाणे) :** ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात शिक्षण हक्काच्या नावाने पालकांची आर्थिक लूट होत असून ज्याच्या शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत फॉर्म भरून ज्यांना प्रवेश मिळालेला आहे अशांना पुस्तके व गणवेश खरेदीची सक्ती केली जात आहे तसेच राज्य शासनाने स्पष्ट परिपत्रक काढलंय की शाळांनी विशिष्ट दुकानातूनच गणवेश/पुस्तके खरेदी करायला सांगू नये असे शासन परिपत्रक असतांनाही अनेक खाजगी शाळा शासनाचा आदेश धुडकावून ठराविक दुकानातूनच महागडे पुस्तके–गणवेश घ्यायला भाग पाडत आहेत, याचा पालकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून त्या पालकांवर अन्याय होत असून शिक्षण हे शहापूर तालुक्यात बाजार झाला असून त्या मध्ये विद्यार्थ्यांना व पालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. खाजगी शाळेत आरटीई मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांन कडून गणवेशाचे,



पुस्तकाचे व इतर वस्तुरूपाने पालकडून पैशाची मागणी केली जाते. पालकांनी पूर्ण न केल्यास त्याच्या पाल्याला व्यवस्थित शिकवलं जात नाही तसेच इतर मुलासमोर त्यापल्याला नाहक त्रास देण्यात येत असल्याचे पालक वर्गात कुजबुज सुरु असल्याचे पाहव्यास मिळत आहे. तसेच काही शाळेत बाजार भावापेक्षा शाळेत पुस्तकांची जास्तीची किमत आकारली जात असल्याचे पालकांच्या निदर्शनास येत असल्यामुळे पालकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. शिक्षण हक्क कायदा २००९ अंतर्गत २५% आरटीई कोट्यातून प्रवेश घेतलेल्या गरीब विद्यार्थ्यांची खाजगी शाळांकडून होणारी आर्थिक लूट होत असून ती थांबविण्यात यावे अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसेना (ऊबाठा) तर्फे देण्यात आला असून तशा प्रकारचे लेखी निवेदन मा. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती शहापूर यांना देण्यात आले आहे. तसेच पालक वर्गावर होत असलेला अन्याय दुर न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असेही निवेदनात म्हटले आहे. या संबधी शिक्षण

**कायदा काय सांगतो?**

केंद्र शासनाचा RTE अधिनियम २००५ कलम ३(२) व ८(२) आणि महाराष्ट्र शासनाच्या RTE नियम २०११ नुसार RTE २५% कोट्यातील कोणत्याही विद्यार्थ्याकडून इयत्ता १ली ते ८वी पर्यंत शिक्षण, पाठ्यपुस्तके, गणवेश, स्टेशनरी साठी एक रुपयाही फी घेता येणार नाही. सर्व खर्च शाळेला शासनाकडून प्रति विद्यार्थी खर्च म्हणून मिळतो.

# पारनेरच्या गायकवाड कुटुंबाची देशसेवेत उत्तुंग भरारी

## वडील सुभेदार मेजर, दोन्ही मुलं बनली भारतीय सैन्यात लेफ्टनंट

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, अहिल्यानगर :** देशसेवा ही केवळ नोकरी नसते, तर ती पिढ्यान्पिढ्या जपली जाणारी संस्कृती असते, याचं जिवंत उदाहरण म्हणजे अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील गायकवाड कुटुंब.

या कुटुंबाने देशसेवेचा असा आदर्श घालून दिला आहे की आज संपूर्ण तालुक्याला त्यांचा अभिमान वाटत आहे. एकाच घरातील वडील आणि दोन्ही पुत्र भारतीय सैन्यदलात अधिकारी पदावर कार्यरत असल्याने गायकवाड कुटुंब सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे.

पारनेरचे भास्कर तुकाराम गायकवाड हे गेली तब्बल २८ वर्षे भारतीय सैन्यदलात सुभेदार मेजर म्हणून कर्तव्य बजावत आहेत. शिस्त, प्रामाणिकपणा आणि देशभक्तीच्या जोरावर त्यांनी सैन्यात मानाचे स्थान निर्माण केले. त्यांच्या या कार्याची प्रेरणा घेऊन त्यांचे दोन्ही पुत्र प्रसाद आणि प्रकाश यांनीही वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत भारतीय सैन्यदलात अधिकारी बनण्याचा निर्धार केला.



४ वर्षांपूर्वी दोघांचीही निवड राष्ट्रीय संरक्षण अकादमी (NDA) प्रशिक्षणासाठी झाली. बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपमार्फत झालेल्या या निवडीनंतर त्यांनी एनडीएमधील कठोर आणि अत्यंत आव्हानात्मक प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. त्यानंतरइंडियन मिलिटरी अकादमी, देहराडून येथे एक वर्षाचे विशेष प्रशिक्षण घेतल्यानंतर दोघांची ही भारतीय सैन्यदलातील लेफ्टनंट पदावर नियुक्ती करण्यात आली.

पारनेर तालुका हा भाग सैनिक परंपरेसाठी ओळखला जातो. या मातीतून अनेक तरुण देशसेवेसाठी सैन्यात दाखल झाले आहेत. विशेष म्हणजे राळेगणसिद्धी चे जेष्ठ सम जसेवक अण्णा हजारे यांनीही भारतीय सैन्यदलात सेवा बजावली आहे. अशा भूमीत गायकवाड कुटुंबाने घडवलेली ही कामगिरी संपूर्ण पारनेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरत आहे.

आज वडील सुभेदार मेजर आणि दोन्ही पुत्र लेफ्टनंट पदावर देशसेवा बजावत असल्याने गायकवाड कुटुंबाने केवळ पारनेरच नव्हे, तर संपूर्ण म हाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. देशभक्तीचा वारसा अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# दोन सख्खे भाऊ लेफ्टनंट पदावर हा दुर्मिळ योग - डॉ.खिलारी

## आम्ही टाकळीकर व ढोकेश्वर विद्यालयाच्या वतीने भव्य नागरी सत्कार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर येथील रहिवासी आणि भारतीय सैन्यदलात सुभेदार मेजर म्हणून कार्यरत असलेले भास्कर तुकाराम गायकवाड यांच्या दोन्ही पुत्रांनी प्रकाश आणि प्रसाद गायकवाड हे दोन सख्खे भाऊ आई, वडील, शिक्षक यांच्याकडून प्रेरणा घेऊन ध्येय ठरवून, मोठे स्वप्न पाहून सैन्यात लेफ्टनंट पदापर्यंत वयाच्या २३ व्या व २१ वयातच पोहोचले हा दुर्मिळ योग असावा असे प्रतिपादन जिल्हा मराठा संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी यांनी केले.

ढोकेश्वर विद्यालय व आम्ही टाकळीकर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या प्रसंगी डॉ. खिलारी बोलत होते.

यावेळी लेफ्टनंट कर्नल प्रकाश व प्रसाद यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते म्हणाले, ८ वी, ९ वी व दहावी हे जीवनाचे ध्येय ठरविण्याची वेळ आहे तर ११ वी, १२ वी ही गोल्डन वेळ आहे. यावेळी जीवनातील बेस्ट अभ्यास करण्याची गरज आहे. आई - वडिलांसाठी, विद्यालयासाठी, गावासाठी, देशासाठी काम करा. यशप्राप्ती, सामाजिक कार्यकर्ते पंडीत नाना झावरे, प्राचार्य लक्ष्मणराव मतकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी नवोदय विद्यालयाचे विद्यार्थी, प्र.ग.खिलारी पाटील या विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब बाळासाहेब निवडुंगे, मेजर गणपत ठाणगे, आई मंदा गायकवाड, वडील भास्कर गायकवाड, नवोदय विद्यालयाचे खिलारे सर, बापूसाहेब



रांधवण, गणेशजी गायकवाड, डॉ. नरेंद्र मुळे, प्रविण झावरे, अशोक गांगड, पत्रकार विनोद गायकवाड, संतोष कोरडे, वसंत रांधवण, अतुल सैद, अविनाश भालके, निलम खिलारी, वैशाली गायखे, दादाभाऊ नवले, प्रताप खिलारी, संतोष सोनवणे, उपप्राचार्य विरेंद्र धनशेट्टी, प्रा. कोठावळे, प्रा.सुरोशी, प्रा.आल्हाट, प्रा.घुले, डॉ.वीर, चौरे, भालेकर, चव्हाण, रवी मते इत्यादी पालक आणि शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊसाहेब हिंगडे यांनी केले तर आभार बाबासाहेब जाधव यांनी मानले.

**विद्यालयास स्मार्ट बोर्ड देणार**

विद्यालयातील वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी इंटरअॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड आम्ही टाकळीकर ग्राम विकास प्रतिष्ठान लोकसहभाग व माजी विद्यार्थी यांच्या सहयोगातून लवकरच देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक, पत्रकार चाँद शेख यांनी प्रास्ताविकात दिली.

# टॉवर ग्रस्त शेतकऱ्यांसाठी 'आबा' आक्रमक - ऊर्जा मंत्र्यांकडे विशेष बैठकीचा तगादा

## रेडी रेकनर'च्या दुप्पट मोबदला अपुरा, द्राक्षबागांच्या नुकसानीचा मुद्दा ऐरणीवर

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०२, पंढरपूर :** माढा विधानसभा मतदारसंघातील उच्चदाब वीज प्रसारण टॉवरमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रलंबित अडचणी व नुकसानभरपाईच्या प्रश्नावर आमदार अभिजीत (आबा) पाटील आक्रमक झाले आहेत. विधानसभेत ऊर्जा मंत्री श्रीमती मेघना दिपक साकोरे-बोर्डीकर यांनी दिलेल्या आश्वासनानुसार तातडीने विशेष बैठक आयोजित करण्याची मागणी त्यांनी पत्राद्वारे केली आहे.राज्य विधानसभेच्या अधिवेशनात आमदार पाटील यांनी भोसे, गुरसाळे तसेच मतदारसंघातील विविध गावांतील टॉवर ग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न सभागृहात प्रभावीपणे मांडले होते. रेडी



रेकनरच्या दुप्पट दराने दिला जाणारा मोबदला प्रत्यक्ष बाजारभावाच्या तुलनेत अत्यल्प आहे. द्राक्षबागांसह कायम स्वरूपी पिकांचे होणारे नुकसान लक्षात घेऊन अधिक योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली होती.यावर उत्तर देताना ऊर्जा मंत्री

> टॉवरग्रस्त शेतकऱ्यांची प्रलंबित नुकसान भरपाई, मोबदल्यातील विसंगती तसेच इतर प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, ऊर्जा मंत्री, जिल्हाधिकारी, वीज कंपनी व शेतकरी प्रतिनिधींची संयुक्त बैठक घ्यावी, रेडी रेकनरच्या दुप्पट दर अपुरा; बाजारभावाप्रमाणे नुकसान भरपाई द्यावी, द्राक्षबागा सह बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीचा स्वतंत्र निकष लावावा माढा मतदारसंघातील सर्व टॉवरग्रस्त शेतकऱ्यांची प्रकरणे तत्काळ निकाली काढा.
>
> **- आमदार अभिजीत (आबा) पाटील (माढा, विधानसभा)**

मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन म ाढा मतदारसंघातील प्रलंबित प्रकरणे व शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सभागृहात आश्वासन दिले होते. या आश्वासनाची अंमलबजावणी व्हावी, यासाठी आम दार अभिजीत (आबा) पाटील यांनी ऊर्जा मंत्र्यांना अधिकृत पत्र पाठवले आहे. ऊर्जा मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हाधिकारी, संबंधित वीज प्रसारण संस्था, महसूल विभागाचे अधिकारी आणि शेतकरी प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत तातडीने विशेष बैठक आयोजित करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# शहापूरात शिक्षण हक्कासाठी विद्यार्थ्यांचा एल्गार; 'देवाभाऊ'ना ८ हजार पोस्टकार्ड

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.०२, शहापूर (ठाणे) :** महाराष्ट्रातील प्रत्येक मुलाला ३ ते १८ वर्षांपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे, या मागणीसाठी श्रमजीवी संघटनेच्या वतीने राज्यव्यापी जनजागृती अभियानाची दमदार सुरुवात करण्यात आली. संस्थापिका मा. विदुलताताई पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू करण्यात आलेल्या या अभियानाला शहापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, पहिल्याच दिवशी सुमारे ८ हजार विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना पोस्टकार्ड लिहून आपली मागणी मांडली.



प्रिय देवाभाऊ, महाराष्ट्रातील प्रत्येक मुलाला १८ वर्षांपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण तुम्हीच देऊ शकता, असे भावनिक आवाहन विद्यार्थ्यांनी पोस्टकार्डमधून केले. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (छएझ २०२०) व नीती आयोगाच्या शिफारशींचा आधार घेत, १८ वर्षांपर्यंत मोफत शिक्षणाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. सध्या १४ वर्षांपर्यंतच मोफत शिक्षणाची तरतूद असून, बदलत्या काळात १८ वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचे करणे अत्यावश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. तालुक्यातील विविध भागांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात पोस्टकार्ड लिहून संबंधित टपाल पेट्यांमध्ये पाठवले. साकडबाव येथील मुख्य कार्यक्रमात कार्याध्यक्ष मा. बाळाराम भाऊ भोईर, जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण चौधरी, कार्यालय सचिव कमलाकर शिंदे, तालुका संघटक कैलास मुकणे, गटाध्यक्ष नकुल विशे, गणाध्यक्ष संतोष गिरा आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच शहापूर, पिवळी, खर्डी, आटगाव, किन्हवली, वासिंद, खातिवली, कसारा, वाशाळा, शिरोळ, अघई आणि तानसा येथील पोस्ट कार्यालयांमध्ये स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून अभियान यशस्वी केले. शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क असून तो १८ वर्षांपर्यंत मोफत व सक्तीचा करण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी एकमुखी मागणी विद्यार्थ्यांनी या अभियानातून केली. या उपक्रमाला पालक, नागरिक आणि कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, राज्यभर हे अभियान अधिक व्यापक करण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे.

# थोडक्यात

## राज्यातील ६ तालुका क्रीडाधिका-यांना पदोन्नती देत जिल्हा क्रीडाधिकारी म्हणून नियुक्ती

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०२, मुंबई :** राज्य शासनाने आज राज्यातील सहा तालुका क्रीडाधिका-यांना पदोन्नती देत जिल्हा क्रीडाधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. यामध्ये सातारा जिल्ह्याच्या प्रभारी जिल्हा क्रीडाधिकारी संगीता जगताप यांचा समावेश आहे. त्या क-हाड तालुका क्रीडाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांची अहिल्यानगरच्या जिल्हा क्रीडाधिकारी पदी नियुक्ती झाली आहे. या बरोबरच अंधेरी तालुका क्रीडाधिकारी मार्क धरमाई यांना सिंधुदूर्ग, वाळवा तालुका क्रीडाधिकारी सचिन चव्हाण यांना वाशिम, खेड तालुका क्रीडाधिकारी विजय शिंदे यांना रत्नागिरी, पुणे (मुख्यालय) तालुका क्रीडाधिकारी संजोग ढोले यांना रायगड, खांमगवा तालुका क्रीडाधिकारी लक्ष्मीशंकर यादव यांना गोंदिया येथे नियुक्ती देण्यात आली आहे.

## आ.तनपुरे यांच्या माध्यमातून पिंपरी अवघड येथील जिल्हा परिषद शाळेला पुस्तकांची भेट

**अक्षराज : प्रमोद डफळ**



**दि.०२, राहुरी (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पिंपरी अवघड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि ज्ञानवृद्धीस चालना मिळावी या उद्देशाने आमदार प्राजक्तदादा तनपुरे यांच्या माध्यमातून विविध युगपुरुष, समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते, शास्त्रज्ञ तसेच प्रेरणादायी गोष्टींच्या पुस्तकांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचे ग्रामस्थ, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी स्वागत केले. यावेळी भाऊसाहेब गटकळ, अर्जुन बाचकर, गोपी लांबे, माजी सरपंच श्रीकांत बाचकर, आबासाहेब लांबे, कृष्णा कांबळे, लहानु जगधने, आमदारांचे स्वीय सहायक विजय टापरे, शरद तनपुरे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता जाधव तसेच शिक्षक मच्छिंद्रनाथ टिळक, श्रीमती कल्पना मेहत्रे, श्रीमती अर्चना पोटघन, श्रीमती ज्योती पुरी, अनिल पवार, शिवाजी कुलट यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी सरपंच श्रीकांत बाचकर यांनी सांगितले की, आमदार प्राजक्तदादा तनपुरे यांनी पिंपरी अवघड गावाच्या विकासासाठी विविध निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच शाळेच्या प्रवेशोत्सव कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी विविध पुस्तकांची भेट देण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. त्या आश्वासनाची आज पूर्तता झाल्याने ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांनी या पुस्तकांचा नियमित अभ्यास व वाचन करून आपल्या ज्ञानात भर घालावी, बुद्धिमत्तेचा विकास करावा आणि भविष्यात उच्च शिक्षण घेऊन मोठ्या उंचीवर पोहोचावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन गंगाधर जवरे यांनी केले.

## डॉक्टर दिनाच्यानिमित्त आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षिका यांना शुभेच्छा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, आळंदी (पुणे) :** डॉक्टर दिनाच्यानिमित्त आळंदी ग्रामीण रुग्णालय येथे आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षिका शिंदे मॅडम यांना भेटून डॉक्टर दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. शिंदे मॅडम आल्यापासून ग्रामीण रुग्णालयाचा कायापालट झालेला आहे. गोरगरीब दिन दलित, शोषित पीडित यांना योग्य उपचार मिळतात योग्य सेवा मिळते. त्यामुळे आळंदी शहरातील तमाम झोपडपट्टी धारक पथविक्रेता आळंदी ग्रामस्थ यांना अशाच पद्धतीने चांगली आरोग्य सेवा मिळावी अशी माऊलींचे चरणी प्रार्थना करून ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक शिंदे मॅडम यांच्यासह त्यांच्या सर्व टीमला पुणे जिल्हाध्यक्ष संतोष सोनवणे यांनी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल संलग्न पथारी सुरक्षा दल सह वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पुणे जिल्हा महिला आघाडी कार्याध्यक्षा निलम सोनवणे, आळंदी नगरपरिषद सदस्य काजल धोंडगे, वंचित बहुजन आघाडी पुणे जिल्हा सहसचिव धीरज कांबळे, वंचित बहुजन आघाडीचे खेड तालुका कार्याध्यक्ष दत्ता कांबळे सह कार्यकर्ते उपस्थित होते.

## माजगाव जि.प शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०२, उंब्रज (सातारा) :** द युवा ग्रामीण पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य (सातारा जिल्हा – पाटण तालुका) यांच्या वतीने 'एक हात मदतीचा' या सामाजिक उपक्रमाअंतर्गत माजगाव (ता. पाटण) येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे पाटण तालुका अध्यक्ष विक्रम महीपाल यांच्या संकल्पनेतून व सातारा जिल्हाध्यक्ष पांडुरंग लोहार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दत्तात्रय सुतार (चाफळ) होते, तर रविराज पाटील, चेअरमन, विकास सोसायटी, माजगाव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक पक शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पाटण तालुक्यातील सुमारे ७०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. रविराज पाटील यांच्या सौजन्याने व दत्तात्रय सुतार यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

यावेळी जिल्हाध्यक्ष पांडुरंग लोहार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय देशमुख, शिखरे सर, सचिन भिसे, अविनाश भिसे, भरत कुराडे, मुख्याध्यापक खालकर सर, सुमीत सरडे, केसकर मॅडम, लोंढे मॅडम तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत अशा सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संयोजकांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक खालकर सर यांनी मानले.पाटण तालुकाध्यक्ष विक्रम महीपाल यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक उल्लेखनीय उदाहरण ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.